महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
अतिउच्चदाब(संवसु) विभाग,सोलापूर.
सीआयएन नं.यु ४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४६


| | |
|---|---|
| ऑफीसचे नांव : | कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,म.रा.वि.पारेषण कंपनी, मर्यादित, |
| ऑफीसचा पत्ता: | प्रशासकीय इमारत २२० के.व्ही. बाळे उपकेंद्र आवार बार्शीरोड अंबिकानगर बाळे, सोलापूर.४१३२५५.(महाराष्ट्र) |
| संपर्क नं .(फोन). ☎ | ०२१७ (वै) २३५०६७३<br>०२१७(का) २३५१८२७ |
| फॅक्स- | ०२१७.२३५१८२७ |
| Email Address: | ee6210@mahatransco.in |
| Website: | wwwmahatransco.in |


जा.क्र:- काअ/अऊदा/(संवसु)/ वि/सोला./मासं/ 1281 दिनांक:- 1 OCT 2021

## जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, सोलापूर अंतर्गत आय.टी.आय.वीजतंत्री शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणाकरीता भरती घेण्यात येत आहे याकरिता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून पात्र विद्यार्थ्यांनी / उमेदवारांनी दि.१०.१०.२०२१ चे रात्री २३:५९ वाजेपर्यंत WWW.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर आस्थापना क्र.E09162700771 वर नोंदणी करून ऑनलाईन अर्ज करावे.

| आस्थापनेचा नोंदणी (Registration) क्र. | ट्रेड | एकूण |
|---|---|---|
| E09162700771 | वीजतंत्री ( **Electrician** ) | एकूण जागा ६३ |

१. उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार सोलापूर जिल्हा उमेदवारांकरीता १०० टक्केप्रमाणे भरती करण्यात येईल.
२. ऑनलाईन नोंदणी / अर्ज करण्याची अंतिम तारीख १०.१०.२०२१ चे रात्री २३:५९ वाजेपर्यंत राहील.
३. शैक्षणिक अर्हता-महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
४. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहिल.पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनेस बंधनकारक राहणार नाही.
५. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमानुसार लागु राहील.
६. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नांव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नांवाशी सुसंगत आहे किंवा असे याची पडताळणी करून माहिती भरावी.
७. एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक / प्रमाणपत्र (चार ही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.
८. शिकाऊ उमेदवारांची सही, पालकांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी. मार्क, आयटीआय मार्क , ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवाराचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

९. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.शिकाऊ उमेदवारानी ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना पोर्टलवर फोटो, मुळप्रमाणपत्राची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळप्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०.वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागास वर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम).

११.ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवारानं सद्यस्थितीत कार्यान्वित असणारा E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. E-Mail ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वियत नसल्यामुळे संवर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील.

१२.दि.१०.१०.२०२१ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती पक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३.आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणासंबंधीत कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१४.शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१५.ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांना दस्तऐवज / शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी करीता ई-मेलद्वारे दिनांक, वेळ व स्थळ कळविण्यात येईल. त्याकरीता खाली नमूद केलेल्या दस्ताऐवजांसह व शैक्षणिक कागदपत्रांसह उमेदवारांनी उपस्थितीत रहावे.

(खालीलप्रमाणे यादी)
अ)पासपोर्ट साईज फोटो-२.
ब)ऑनलाईन नोंदणीचे दस्तऐवज व शैक्षणिक कागदपत्रे (मुळ प्रती)
क)शाळा सोडल्याचा दाखला, बोर्ड प्रमाणपत्र.
ड)आय.टी.आय.गुणपत्रक (चारही सत्र / वार्षिक)
इ)मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र.
ई)आधारकार्ड, बॅंक पासबुक (मुळ प्रत)(शक्यतो बॅंक ऑफ इंडिया चे असावे)

वरील सर्व कागदपत्रांची छायांकित, साक्षांकित प्रतीसोबत बाळगावी.

१६.सदर भरतीकरीता महापारेषण कंपनीचे वेळोवेळी प्रसारीत केलेले संबंधित परिपत्रके , नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

१७.उमेदवारांची निवड एस.एस.सी. चे गुण व आय.टी.आय.चे चारही सत्रांच्या गुणांची बेरीज आणि त्यांची सरासरीनुसार होईल व मौखीक चाचणी घेतली जाणार नाही किंवा इतर कोणतेही गुण ग्राह्य धरण्यात येणार नाही.

आपला विश्वासू

कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग,सोलापूर.

प्रत सस्नेह रवाना :-
मा.प्राचार्य,औद्योगीक प्रशिक्षण संस्था,बी.टी.आर.अधिकारी,
विजापूर रोड सोलापूर